# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२२२१७
ई.मेल.आय.डी.क्रं dydpune@gmail.com वेब साईट क्रमांक www.dydepune.com

जा.क्रं.उमाशि-२/संच मान्यता/पुवि/२०१५-१६ 17490-97
दिनांक :- ४/९/२०१५

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे / सोलापूर / अहमदनगर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पटपडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता बाबत

संदर्भ :- या कार्यालयाकडील पत्र समक्रमांक १६४८२ दिनांक २१/८/२०१५

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्रान्वये मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दिनांक ११/८/२०१५ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पटपडताळणी, कार्यभार निश्चिती संच मान्यता शिबीर पुणे जिल्हयासाठी दिनांक २४/८/२०१५ ते १०/९/२०१५ या कालावधीसाठी आयोजीत केलेले आहे. तसेच सोलापूर व अहमदनगर जिल्हयासाठी दिनांक ३१/८/२०१५ ते ५/९/२०१५ या कालावधीसाठी संच मान्यता शिबिर आयोजीत केलेले आहे हे सर्वांना ज्ञात आहेच.

या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, आजपर्यंत संच मान्यता बाबतचे ५० टक्के इतकेच काम पूर्ण झालेले असून सदरील मान्यता शिबिर पुढे काम पूर्ण होईपर्यंत सलग चालू ठेवण्याबाबत शासनाने आदेश दिलेले आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे दिलेल्या वेळापत्रकानुसार संच मान्यता शिबिर चालू राहील. याप्रमाणे आपण आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करावयाची आहे.

| अ.क्रं. | जिल्हा | कालावधी | | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे | दि. ७/९/२०१५ ते ८/९/२०१५ | पुणे शहर, पिंपरी चिंचवड, व हवेली | स्थळ : राजीव गांधी अॅकॅडमी ऑफ ई-लर्नींग स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज, सहकार नगर, पुणे ४११००९ |
| | | दि. ९/९/२०१५ | भोर वेल्हा, मुळशी | स्थळ : अॅग्लो उर्दू हायस्कूल ज्युनिअर कॉलेज, पुणे |
| | | दि. १०/९/२०१५ | जुन्नर, आंबेगांव | स्थळ : रा. प. सबनीस कनिष्ठ महाविद्यालय, नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे |
| | | दि. ११/९/२०१५ | खेड, शिरुर | |
| २ | सोलापूर | दि. ७/९/२०१५ ते ९/९/२०१५ | माळशिरस, पंढरपूर मंगळवेढा, सांगोला करमाळा, माढा | स्थळ : कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, सोलापूर |
| | | दि. १०/९/२०१५ ते ११/९/२०१५ | सोलापूर शहर, दक्षिण, उत्तर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ | स्थळ : वालचंद महाविदयालय, सोलापूर |

| अ.क्रं. | जिल्हा | कालावधी | | स्थळ |
|---|---|---|---|---|
| ३ | अहमदनगर | दि. ७/९/२०१५ ते ११/९/२०१५ | तालुकानिहाय वेळापत्रक पूर्वीप्रमाणे असेल. | स्थळ : पेमराज सारडा कॉलेज, अहमदनगर |

सदरचे वेळापत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** हया वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १

प्रत - माहितीस्तव सविनय सादर

१. मा. प्रधान सचिव,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

२. मा. आयुक्त शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, (बालभारती) सेनापती बापट रोड, पुणे.१

३. मा. शिक्षण संचालक,
(माध्य व उच्च माध्य) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत – सर्व प्राचार्य, उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे विभाग अंतर्गत जिल्हा : पुणे सोलापूर अहमदनगर

२/- यांना कळविण्यात येते की, संच मान्यता करुन घेण्याबाबतची ही अंतीम मुदतवाढ असून यानंतर ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी संच मान्यता करुन घेतली नाही त्यांस सर्वस्वी संबंधी कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक /प्राचार्य हे जबाबदार राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.